MHBI140007212026

फौ.कि.अर्ज क्र.१००/२०२६
उमेश मल्हारी ढोबळे वि. महाराष्ट्र शासन

## निशाणी क्र.०१ वरील आदेश
## (दिनांक २९/०५/२०२६)

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे आष्टी पोलिस ठाणे येथील गु.र.नं. २०९/२०२६ महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ चे कलम ४८, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) सह कलम ३(५) मध्ये जप्त केलेले वाहन जे.सी.बी. वाहन क्र. एम.एच. १४ सी.एम. ०७०३ परत मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील तपासी अधिकारी व सरकारी वकील यांचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत खटल्यातील आष्टी पोलिस ठाणे येथील गु.र.नं. २०९/२०२६ मधील जप्त वाहन हे अर्जदाराचे मालकीचे असुन त्याबाबत त्यांनी पुरावा न्यायालयात सादर केला आहे. अर्जदारास दैनंदिन कामासाठी वाहनाची गरज असल्यामुळे सदरील जप्त वाहन योग्य त्या अटी व शर्तीवर परत करावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. अभियोगपक्षातर्फे तसेच, तपासी अधिकारी यांनी त्यांचे नि. ८ व ९ वरील खुलाश्यामध्ये अर्जास हरकत घेतली असुन त्यांनी कथन केले की, जप्त वाहन अर्जदारास दिल्यास तो तश्याच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुन्हा हा चोरीचा व गंभीर स्वरुपाचा असुन वाहन परत दिल्यास अर्जदार वाहनात बदल करुन विक्री करण्याची, तसेच वाहन तपासाकामी हजर ठेवण्याची शक्यता नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ नि. ४ वर त्यांचे शपथपत्र तसेच, नि.३ वर खालील प्रमाणे कागदपत्र दाखल केलेली आहेत.

I. आर. सी. बुक ची प्रत.
II. अर्जदाराचे आधारकार्ड,
III. आष्टी पोलिस ठाणे येथील गु.र.नं.२०९/२०२६ मधील प्रथम खबर अहवाल,
IV. वाहनाच्या विमाबाबतचे कागदपत्रे.

५. अभिलेखाचे तसेच, दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आष्टी पोलिस ठाणे येथील गु.र.नं. २०९/२०२६ नुसार तपासी अधिकारी यांनी अर्जदाराकडून वाहन जे.सी.बी. वाहन क्र. एम.एच. १४ सी.एम. ०७०३ जप्त केल्याचे दिसुन येते. अर्जदाराने दाखल केलेल्या उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन वाहन जे.सी.बी. वाहन क्र. एम.एच. १४ सी.एम. ०७०३ हे अर्जदाराचे

मालकीचे असल्याचे दिसुन येते. सदर वाहन पोलीस स्टेशन येथे पडून राहिल्यास वाहनाचे नुकसान होउन त्याचा तोटा अर्जदारास होऊ शकतो. मा. सर्वोच्च न्यायालयाने ***Sunderbhal Ambalal Desai vs State Of Gujarat AIR 2003 SUPREME COURT 638*** या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वानुसार तसेच तपासी अधिकारी व अभियोग पक्षाने त्यांचे खुलाशामध्ये जी काही हरकत उपस्थित केली आहे त्या बाबत योग्य त्या अटी व शर्तीनुसार सदरील प्रस्तुत अर्जात नमुद वाहन अर्जदार यांना परत करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. गुन्हयाचा तपास करण्यासाठी तसेच आरोपीस अटक करण्यासाठी सदर वाहनाची आवश्यकता दिसत नाही. तसेच सदरील जप्त वाहन पोलिसांच्या ताब्यात ठेऊन काहीही साध्य होणार नाही. त्यामुळे अर्जदार हे जप्त वाहन योग्य त्या अटी व शर्तीवर परत मिळविण्यास पात्र आहेत. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. वाहनाचे स्वरुप लक्षात घेता अर्जदाराने नुकसान भरपाई बंधपत्र (Indemnity Bond) देणे गरजेचे आहे. सबब हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. पोलिस निरीक्षक/तपासी अधिकारी, आष्टी पोलिस ठाणे यांना असे आदेशीत केले जाते की, त्यांनी आष्टी पोलिस ठाणे येथील गु.र.नं. २०९/२०२६ मध्ये जप्त केलेले वाहन जे.सी.बी. वाहन क्र. एम.एच. १४

सी.एम. ०७०३ चा अर्जदार यांना खालील अटींची पुर्तता केल्यास अंतरिम ताबा देण्यात यावा–

i. अर्जदार यांनी रक्कम रु.९,००,०००/– (रक्कम रुपये नऊ लाख मात्र) या किंमतीचे नुकसान भरपाई बंधपत्र (Indemnity Bond) द्यावे.

ii. अर्जदाराने सदर गुन्हयाचा निकाल लागेपर्यंत जप्त वाहन कोणास विक्री करु नये अथवा गहान ठेवु नये. तसेच वाहनाच्या रंगात तसेच मुळ स्वरुपात कोणतेही बदल करु नयेत.

III.अर्जदार यांनी तपासी अधिकारी यांना तपासकामी आवश्यक ते सहाय्य करावे.

३. पोलिस निरीक्षक/तपासी अधिकारी, आष्टी पोलीस ठाणे यांनी जप्त वाहन जे.सी.बी. वाहन क्र. एम.एच. १४ सी.एम. ०७०३ अर्जदार यांना परत करणेपुर्वी त्याचे फोटो अर्जदार यांचे खर्चाने काढुन ते अभिलेखावर ठेवावे.

४. पोलिस निरीक्षक/तपासी अधिकारी, आष्टी पोलीस ठाणे यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार यांनी आदेशाचे वरील कलम २ मधील अटींची पुर्तता केल्यानंतर सदरील मुळ नुकसान भरपाई बंधपत्र (Indemnity Bond) दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावेत.

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.29 16:51:39 +0530

( महेश आर.बडाख )

ठिकाण – आष्टी

दिनांक – २९/०५/२०२६

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.३), आष्टी

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 29/05/2026 |
| Transcribed on | : | 29/05/2026 |
| Checked & signed on | : | 29/05/2026 |

**Sd/-**
R.S. Abnave
(Jr. Clerk)